# अमरावती शहर दैनंदिन गुन्हे अहवाल दिनांक २७/०६/२०२४

विनयभंग :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पोस्टे फ्रेजरपुरा अमरावती शहर अप क्र ५८०/२०२४ कलम ३५४, ३५४ड, ५०६ भादवि | अमरावती | दि ११.०६.२०२४ चे २३.४५ वा ते दि २५.०६.२०२४ चे १८.३० वा दरम्यान दा.ता.वेळ. दि.२७/०६/२४ चे १८-१७ वा. . | एक महिला | सावन बोरखडे रा ता दर्यापुर हददीतील गाव गावाचे नाव माहित नाही | हकीकत अशा प्रकारे आहे की, फिर्यादी ही सन २०२१ मध्ये एका हॉटेल मध्ये स्वयंपाकाचे काम करत असतांना तेथे सावन बोरखडे रा दर्यापुर जि अमरावती हा काम करीत होता फिर्यादी त्याला ओळखत होती परंतु ती त्याच्याशी कधीही बोलली नाही मागील ४० दिवसा अगोदर हॉटेल बंद झले त्यामुळे फिर्यादी आता कोणतेच काम करीत नाही दि ११.०६.२०२४ रोजी रात्री ११.४५ वा दरम्यान फिर्यादी ही घरी हजर असतांना सावन बोरखडे याने त्याचा मोक्र वरून व्हॉटसअॅप वर मॅसेज करून म्हटले की, मला तुला बघायचे आहे तुझा सोबत बोलायचे आहे त्यावर फिर्यादी हिने त्याला उत्तर दिले की तु कोण आहे आणि तुला मला का बघायचे आहे व का माझे सोबत बोलायचे आहे असे फि ने म्हटल्यावर त्याने फि स म्हटले की तु जर माझेसोबत बोलली नाही किंवा माझा व्हिडीओ कॉल उचलला नाही तर माझेकडे तुझा एक व्हिडीओ आहे तो मी हॉटेल येथील सर्व स्टॉपला पाठवेल असे म्हणुन धमकी दिली त्यावरून फि त्याला म्हटले की तुजा जे करायचे ते तु कर मला तुझ्याशी बोलायच नाही आहे मला यानंतर व्हॉटसअॅपवर मॅसेज किंवा व्हॉटसअॅप व्हिडीओ कॉल करायचा नाही असे म्हटल्यावर तो फि ला रोज व्हॉटसअॅप मॅसेज करून अश्लिल भाषेत बोलत होता त्यानंतर फि ने त्याचा मोबाईल क्र हा ब्लॉक केला त्यानंतर दि २५.०६.२०२४ रोजी सायंकाळी ०६.३० वा दरम्यान फि च्या मोबाईल क्र वर फोन आला त्यावर फि ने त्याला विचारले की तु कोण बोलत आहे असे बोलल्यावर सावंत बोरखडे याने फि ला म्हटले की तु माझा कॉल का उचलत नाही मला ब्लॉक का केले त्यावर फि त्याला म्हटले की मला तुझ्या सोबत बोलायचे नाही आहे असे बोलुन फोन कट केला तरी दि ११.०६.२०४ ते दि २५.०६.२०२४ पर्यंत सावन बोरखडे रा ता दर्यापुर जि अमरावती हा वारंवार अश्लिल व्हॉटसअॅप चाट तसेच व्हिडीओ कॉल करून पाठलाग करीत आहे अशा फिर्यादीच्या जबाणी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल |

## चोरी :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पो. स्टे. कोतवाली अप नं २४४/२४ कलम ३८० भादवि | डाकघर बचत बँक ,तहसिल कार्यालय जवळ अमरावती | घटना ता वेळ दि २५/०६/२४ चे १२.३० वा ते १३.०० वा दरम्यान दाखल ता वेळ दि २७/०६/२४ वा चे १७.३६ वा | नविनचंद्र पन्नालालजी भंडारी वय ६२ वर्ष व्यवसाय - एल आय सी एजंट रा गणएश कॉलनी अमरवाती | अज्ञात | हकीकत अशा प्रकारे आहे की माझे डाकघर बचत बँक तहसिल कार्यालय जवळ अमरावती येछे बचत खाते असुन अंदाजे १० वर्षापासुन सुरु आहे माझी महिला नातेवाईक हिने १३ जुलै २०२४ रोजी लग्न असल्याने माझे बचत खाते मधुन पैसे काढण्याकरिता मी दि २५/०६/२४ रोजी १२.३० वा ते १३.०० वा दरम्यान डाकघर बचत बँक तहसिल कार्यालय जवळ अमरावती येथे गेलो आणि मी ४५,०००/- रु काढले आणि माझ्या जवळील पिशवीमध्ये ठेवले त्यानंतर बाजुच्या काउंटर समोर लाईन मध्ये उभा राहुन मी पि एम खाते सबंधाने माहीती प्राप्त करणे करिता उभा होतो माहीती प्राप्त केल्यानंतर मी डाकघरातुन बाहेर जात असतांना मला लक्षात आले की माझ्या हातातील पिशवीतीला ब्लेडने फाडुन त्यात ठेवलेले वर नमुद ४५,०००/- रु रोख चोरी केले मी डाकघर व परिसरात माझ्या पैशाचा शोध घेतला मात्र मिळुन आला नाही करिता माझे पिशवितिल रक्कम कोणीतरी अज्ञात चोराने ४५,०००/- रु रोख चोरी केले म्हणुन माझी त्या अज्ञात चोराविरुध्द कोयदेशिर कार्यवाही करिता रिपोर्ट |

## विश्वासघात फसवणुक :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पो स्टे गाडगे नगर अम अप क्र ५७६/२४ कलम ४२०,५०४ ,५०६,३४ भादवि | पंचवटी चौक गाडगे नगर अम | दि.०९.०९.२१ ते ०६.०४.२४ दरम्यान | रामकृष्ण दहिलाल चव्हाण वय ६५ वर्ष रा नारायण नगर अमरावती | १.प्रशांत दायमा वय ४० वर्ष रा एमआयडीसी अमरावती २.अभिजित उर्फ जितु सावजी वय ४० वर्श रा मेहकर | याप्रमाणे आहे की नमुद घ ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांना व्यवसाय करिता १० चक्का डंम्पर सेकंड हैंन्ड घ्यायचे असलेयाने नमुद आरोपी क्र १ हे दलाल असुन त्यांचे शी संपर्क केला असता त्यांना त्यांना एमएच २८ बीबी ०८०५ अशोक ले लँड १० चक्का डंम्पर आ क्र २ या मालक यांचे कडुन १७ लाख रु मध्ये विकत घेण्याच ठरविले वरुन फिर्यादीने १७ लाख फोन पे व अंकाऊट पे केले व गाडीची एनओसी करुन दिली नाही. फिने आरोपीना गाडीची एनओसी करुन द्या असे वारंवार फोन केले आरोपीतांनी गाडीची एनओसी होत नाही आमच्या बाकी गाड्या सोबत लिंक आहे. तुम्ही गाडी परत द्या व पैसे घेवुन जा असे फोनवर म्हटले. वरुन फि व त्याचा मुलगा त्यांची गाडी परत |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | देण्यास गेले व गाडी परत करुन आमचे पैसे १७ लाख रु परत करा असे म्हटले असता त्यांनी पैसे सध्या नाही नंतर परत करतो असे म्हटले वरुन आम्ही त्याबाबत करार करुन गाडी देवुन परत आलो. ८ दिवसांनी पुन्हा फोन केला तर त्यांनी मुलाचे अकाउंट वर ४ लाख रुपये पाठविले उरवरित रक्कम १३ लाख रु दिले नाही. यातील नमुद आरोपींताना फिर्यादीची आर्थीक फसवणुक करुन फिर्यादीला शिविगाळ करुन मारण्याची धमकी दिली. अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा नोंद |

ईतर :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ<br>माहिती ता.वेळ<br>गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पोस्टे फ्रेजरपुरा अमरावती शहर अप क्र ५८१/२०२४ कलम २८३ भादवि | यशोद नगर चैतन्य कॉलनी अमरावती | दि २७.०६.२०२४ चे १९.३० वा<br><br>दि २७.०६.२०२४ चे २०.३९ वा | सरतर्फे जीपोउपनि श्रीरंग गाढवे बनं ६१६ पोस्टे फ्रेजरपुरा अमरावती शहर | जिवराज देवीलाल जाट वय २४ वर्ष रा ग्राम दामोदरपुरा ता रेलमंगरा जि राजसमंदर राजस्थान हमु दिनेश बोबडे यांचे घरी भाडयाने नंदीपुरा राजापेठ अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की, नमुद घटना ता वेळी व ठिकाणी रिपोर्ट देणार जीपोउपनि श्रीरंग गाढवे बनं ६१६ सोबत पोस्टॉफ पोहेकॉ ९६३, पोकॉ ३१०, ४६१ असे पोस्टे हददीत पेट्रोलिंग करीत असतांना यशोदा नगर चैतन्य कॉलनी अमरावती येथे गेले असता १९.३० वा दरम्यान एक इसम मुख्य रहदारीच्या रोडवर लोकांचे जिवीतास धोका निर्माण होईल अशा स्थितीत आपले ताब्यातील वाहन ओमणी व्हॅन क्र एम एच २७ बी एफ २८४ वर ज्युस विक्री करिता रस्त्यावर लावलेला आढळुन आला पंचांना बोलावुन सदर पंचासमक्ष त्याला त्याचे नाव गाव विचारले असता त्याने आपले नाव जिवराज देवीलाल जाट वय २४ वर्ष रा ग्राम दामोदरपुरा ता रेलमंगरा जि राजसमंदर राजस्थान हमु दिनेश बोबडे यांचे घरी भाडयाने नंदीपरा राजापेठ अमरावती असे सांगितले सदर वाहनामुळे यशोदा नगर ते दस्तुर नगर मुख्यरोड वर येणा-या वाहनांना अडथळा होवुन प्रवाशांच्या जिवीतास हाणी होइल अशा पध्दतीने आमरोडवर लावलेल्या स्थितीत होते त्यांचा पंचासमक्ष पंचनामा केला सदरचे आरोपीचे कृत्य कलम २८३ भादवि प्रमाणे होत असल्याने सदरच्या फिर्याद वरून सदरचा गुन्हा दाखल |
| २ | राजापेठ अप क्र ३७९/२०२४ कलम २९४,३२३, | ग्रंथालय ब्रिजलाल बियानी महाविद्यालय रवि नगर | घ.ता .वेळ दि. २७/६/२४ चे १६.१५ वा. ते १६.३० ा. दरम्यान | अफसर अली मोहमद अली वय ५२ वर्ष रा. निशांतकाँलणी वलगाव | नंदकिशोर रामकृष्ण चोरपगार वय ५२ वर्ष रा. टी. टी. नगर अमरावती | थोडक्यात हकीकत अशा प्रकारे आहे की , नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी यातील नमुद आरोपी नंदकिशोर चोरपगार वय ५२ वर्ष यांनी अचानक येवुन फिर्यादी यांना शिविगाळ करून तु माझ्या महिला नातेवाईकासोबत का बोलतो असे बोलुन अश्शिल भाषेत शिविगाळ व धमकी देवुन लाथाबुक्यांनी तोंडावर, पोटावर मारहान केली अशा फिर्यादीचे जबाणी रिपोर्ट वरून व मेडीकल सर्टीवरूनसदरचा गुन्हा दाखल |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | ५०६ भादवी | अमरावती | दा.ता.वेळ. दि.२७/०६/२४ चे १९.५७ वा. | रोडअमरावती | धर्म बौध्द | |
| ३ | पो.स्टे. खोलापुरी गेट 152/2024 कलम 142 मपोका | हनुमान नगर परिसरात अमरावती | 27/06/2024 चे 19/00वा 27/06/2024 चे 20/14 वा | हेकॉ राजेश घुरडे ब.नं.757 पो स्टे खोलापुरीगेट अमरावती शहर | रियाज खाँ हयात खाँन वय 35 वर्ष रा सागर नगर अमरावती | हकीकत अश्या प्रकारे आहे की यातील आरोपी हा तडीपार असुन पो स्टे ला दाखल एन सी क्र.739/2024 कलम 323,504 भादवि नुसार अर्जदार यांनी सांगीतले कि यातील आरोपी हा परिसरातच फिरत आहे वरुन फि यांनी सदर आरोपी हा तडीपार असुन त्यास अर्जदार यांचे सोबत असलेला आरीफ अली यांनी तडीपार इसम नामे रियाज खाँ हयात वय 35 वर्ष रा सागर नगर अमरावती स्टे ला आणुन हजर केल्याने फि यांनी सदर गैरअर्जदार तडीपार यास पो स्टे हद्दीत फिरण्याचे कारण विचारले असता त्याने उडवाउडविचे उत्तर दिले व दिनांक 14/02/2022 पासुन मा.पोलीस उपायुक्त परि -2 /तडीपार /1513/2022 दिनांक 14/10/2022 रोजी आदेशाची अंमलबजावणी करण्यात आली असुन सुध्दा तो कोणतीही पुर्व परवानगी न घेता परीसरातील वरिल आदेशाचे उल्लधन करुन मिळुन आला वरुन सदर आरोपी विरुध्द कलम 142 मपोका प्रमाणे कायदेशीर फिर्याद आहे अश्या फिचे जबानी रि वरुन सदर चा गुन्हा दाखल |

➢ जुगार रेड :-

| अ. क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हयाचा प्रकार | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पो. स्टे. राजापेठ | अप क्र. ३७८/२४ कलम १२(अ) म.जु.कहिं. | जुगार | दसरा मैदान झोपडपट्टी अमरावती | दि. २७/६/२४ चे १५.०० वा. दरम्यान | दा. ता. वेळ - दि. २७/६/२४ ते १७.२७ वा. | सर तर्फे HCमनिष करपे ब. नं. १५२० पो. स्टे. राजापेठ अमरावती | मनोज उर्फ पिल्या प्रमोद खंडारे वय ३६ वर्ष रा. दसरा मैदान अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहेए की नमुद घचना ता. वेळी व ठिकाणी .तील फिर्यादी यांनी पो. स्टॉंपसह मिळालेल्या माहितीवरून जुगार रेड केली असता आरोपी याचे ताब्यातुन ५६० रू. नगदी व ०१ ते १० आकडे लुहलेल्या चिठ्या व बॉंलपेन एक कि. अं. ०५ रू. असा एकुण ५६५ रू. चा माल. मिळुन आला आहे सदरचा माल पंचासमक्ष जप्त करण्यात आला वरूनआरोपी विरूध्द सदरचा गुन्हा दाखल |

अकस्मात मृत्यु :-

| अ. क्र. | पो.ठाणे मर्ग.क्र. व कलम | घटना स्थळ | मृतकाचे नांव | फिर्यादी | अकस्मात मृत्यूचे विवरण |
|---|---|---|---|---|---|
| १ | पो.स्टे.गाडगेनगर अम. मर्ग नं. ४३/२४ कलम १७४ जा.फौ. | लुबिनी कांलनी अमरावती | राहुल विनोदराव थोरात वय ३५ वर्ष रा. लुंबिनि नगर अमरावती | नापोकाँ.निलेश ब.न. १३०० पो.स्टेगाडगेनगर अम. | आम्ही म.पो.हे.काँ. अनिता ब.नं १३२४ आमची आज दि. २६.६.२४ रोजी १४.०० वा.ते २१.०० वा स्टे.डा. डयुटी असताना मेमो क्र १७१२ इर्विन दवा. ना.पो.कां. १३०० पो.स्टेगाडगेनगर यांनी मृतक नामेराहुल विनोदराव थोरात वय ३५ वर्ष रा. लुंबिनि नगर अमरावती गळफास घेतल्याने मरण पावले सदरचा मेमो दाखल करुन तपासात घेतला. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २ | पो.स्टे ` नागपुरीगेट अमरावती मर्ग क्र १३/२४ कलम १७४ जाफो | विद्यानिकेतन शाऴेच्या परिसरात अमरावती | अनोऴखी महीला | पोउपनि जितेद्र भार्गव पो.स्टे ` नागपुरीगेट अमरावती | हकीकत अशा प्रकारे ` आहे ` की, यातील फिर्यादी यांनी दि २७/०६/२४ चे १४/०० वा ते २१/००वा पावेतो डि. ओ ड्युटी असता एक इसम पो.स्टेला येवुन माहीती दिली की, विद्यानिकेतन शाऴेच्या परिसरात एक महीला बेशुद्ध अवस्थेत पडली आहे वरुन सदर घटनास्थऴी पो.स्टाफ सह जावुन पाहणी केली असता अंदाजे वय ६५ वर्ष एक महीला बेशुद्ध अवस्थेत पडली दिसली वरुन घटनास्थऴ पंचनामा केला सदर महिलेस तेथील लोक ओऴखत नसुन ती काही दिवसा पासुन तेथे राहत आहे  असे माहीती पडले वर्ण वय अंदाजे ६५ वर्ष ,दोन्ही पाय गुडघ्या पासुन शरीर एका रंगबीरंगी कंबल ने झाकलेले दिसत आहे .डोक्याचे केस काऴे  पाढरे बाँयकट दिसत आहे .अंगात पाढ-या क्रीम रंगाचे ब्लाउज, लाल हिरव्या रंगाची साडी त्यावर सिल्वर व हिरव्या रंगाचे फुल असलेी गळ्यात वेगवेगळ्या प्रकारच्या माळा ,डाव्या पायात चेन पट्टी , व दोन्ही रहातात वेगवेगळ्या रंगाच्यया बोगड्या तेसच सदर महिलेला तपासणी करिता जिल्हा सामान्य रुगन्यालय अमरावती पोका १७३७ यांचे हस्ते रवाना केल् असता तेथील डां सा ंयांनी मृत घोषीत केले सदर महिलेचे प्रेत हे शवविश्छेदन करित ओळख पटने बाकी असल्याने शवागार येथ ेदाखल केले तसा मेमो क्र १७१५ प्राप्त करुन पो.स्टे ेला मर्ग क्र १३/२४ कलम १७४ जाफो प्रमाने मर्ग दाखल |